CR2021012521

विषय :- ड्रोनव्दारे गावठाण नगर भूमापन झालेली गावे परिरक्षणास घेणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य) , पुणे
दूसरा व तिसरा मजला , नवीन प्रशासकीय इमारत , विधान भवन समोर , कॅम्प , पुणे १

दूरध्वनी क्र. 020-26137110 Email ID :dlrmah.mah@nic.in Web site :https://mahabhumi.gov.in

---

वाचा :- १. नगर भूमापन नियम पुस्तीका
२.महसूल व वनविभागाकडील शासन निर्णय क्रमांक १०९३/प्र.क्र.१९/ल-१ दि.१८/०८/१९९४
३.ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र.१३/मातंक दि.२२/०२/२०१९

---

क्र.गावठाण/ड्रोन सर्व्हे/प्र.क्र.३९/२०२१ दिनांक: २५/०१/२०२१

परिपत्रक :

नगर भूमापन नियम पुस्तिकेतील प्रकरण १० मधील परिच्छेद १४६ मध्ये "नगर भूमापन व चौकशी पूर्ण झालेनंतर अभिलेख जिल्हाधिका-यांकडे किंवा ते घेण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांकडे अभिलेखाचा प्रभार सोपवण्यात येईल" अशी तरतूद आहे. त्या अनुषंगाने नगर भूमापन व चौकशी पूर्ण झालेनंतर सदरची गावे परिरक्षणास घेण्यात येतात. गावठाण भूमापनाचे काम पुर्ण झालेल्या गावातील अभिलेखांचे / नकाशाचे परिरक्षण काम करून गावचे अभिलेख वेळोवेळी अद्यावत ठेवणेचे काम उप अधिक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी कार्यालयाचे अधिनस्त परिरक्षण भूमापक यांचे मार्फत केले जाते.

ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०१८/प्र.क्र.१३/मातंक तारीख २२ फेब्रुवारी २०१९ चे शासन निर्णयान्वये राज्यात गावठाण जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिलेली आहे. गावठाण जमाबंदी प्रकल्पातंर्गत राज्यातील एकुण ३९,७३३ गावांचे गावठाण भूमापनाचे काम ३ वर्षात पुर्ण करावयाचे आहे. सदर प्रकल्पातंर्गत महाराष्ट्र राज्यात अत्याधुनिक ड्रोनव्दारे पहिल्या टप्प्यात १११ गावांचे गावठांण भूमापन करणेचे काम पूर्ण झाले आहे. राज्यातील उर्वरित सर्व गावांतील गावठाण भूमापनाचे काम सूरू झालेले आहे. सदरचे काम पुर्ण झालेनंतर सदरची गावे परिरक्षणासाठी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे ड्रोनव्दारे गावठाण नगर भूमापनाचे काम जलदगतीने होणार असलेने नगर भूमापन व चौकशी पूर्ण झालेनंतर सदरची गावे परिरक्षणास घेणेकामी मंजूरी देणेचे प्रस्ताव मोठया प्रमाणावर प्राप्त होणार आहेत. त्यामुळे परिरक्षणास गाव घेणेस व संबंधित परिरक्षण भुमापक यांचेकडील सजास जोडणेस मंजूरी देणेचे अधिकार संबंधित जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांना दिल्यास गावे परिरक्षणास घेणेचे काम वेगाने होवून सनद फी जलद गतीने वसुल होईल व ती रोलींग पध्दतीने इतर गावांचे ड्रोन व्दारे गावठाण भुमापन कामास वापरता येईल.या बाबींचा सर्वकष विचार करुन खालील प्रमाणे सूचना /आदेश देण्यात येत आहे. उप अधिक्षक भूमि अभिलेख यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील गावांचे गावठाण भूमापन, चौकशी काम व अनुसरून काम पुर्ण झाल्यानंतर त्यांचे अधिनस्त परिरक्षण भूमापक यांचे कार्यक्षेत्र व कामाचा व्याप विचारात घेवून सदर गाव



Scanned with CamScanner

परिरक्षणास घेणेचा प्रस्ताव तयार करुन मान्यतेसाठी संबंधित जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे सादर करावा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी प्राप्त प्रस्तावाची पडताळणी करून सदरचे गाव परिरक्षणास घेण्याबाबत व ते कोणत्या कार्यालयाकडे /सजाकडे परिरक्षणास देणेबाबत आदेश पारीत करावा. सदर आदेश राजपत्रात प्रसिध्द करावा.

स्वाक्षरी /-XXX
(एस.चोक्कलिंगम)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमी अभिलेख (म.राज्य) , पुणे

प्रत :-१) सर्व उपसंचालक भूमि अभिलेख यांना माहिती व पुढील योग्यत्या कार्यवाहीसाठी रवाना.
२) सर्व जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख यांना माहिती व पुढील योग्यत्या कार्यवाहीसाठी रवाना.
३) सर्व उपअधिक्षक भूमि अभिलेख यांना माहिती व पुढील योग्यत्या कार्यवाहीसाठी रवाना.
४) निवडनस्ती

"निर्गमित"

SATISH YADAVRAO BHOSALE
Digitally signed by SATISH YADAVRAO BHOSALE
Date: 2021.01.25 14:30:56 +05'30'

(सतीश भोसले)
उपसंचालक भूमी अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (नागरी भूमापन) ,पुणे



Scanned with CamScanner